# प्रकरण पहिले

## प्रवासवर्णन वाङ्मय प्रकार : स्वरूप व विशे

# प्रकरण पहिले

# प्रवासवर्णन वाङ्मय प्रकार : स्वरूप व विशेष

- प्रवासवर्णनाचा उगम
- प्रवासवर्णनाचा वाङ्:मयाचे स्वरूप
- प्रवासवर्णन वाङ्:मय प्रकाराचा अर्थ / व्याख्या
- प्रवासवर्णनाच्या प्रेरणा
- डॉ. वसंत सावंत यांनी सांगितलेली प्रवासाची कारणे
- पु.ल. देशपांडेनी प्रवासाची सांगितलेली कारणे
- प्रवासवर्णन वाङ्:मयाचे महत्वाचे घटक
- प्रवासवर्णन वाङ्:मयाची वैशिष्टये ? विशेष
- प्रवासवर्णन – लेखनाची तयारी व काही गुणधर्म
- समारोप

# प्रकरण पहिले

# प्रवासवर्णन वाङ्.मय प्रकार : स्वरूप व विशेष

**प्रवासवर्णनाचा उगम :**

प्रवास करणे ही मानवी जीवनाची मूलभूत प्रेरणा आहे. प्राचीन काळातील प्रवास अनेक हेतूंनी केला जात होता. ग्रीस देशांतील लोकांबरोबर हिंदू लोकांचा व्यापार सुमारे १२०० वर्षे सुरू होता. भारतीय व्यापारी मध्य आशियापर्यंत आपले उंटाचे तांडे घेऊन प्रवास करीत असत. उद्योग, व्यापार, नोकरी, रोजगार, अर्थार्जन, तिर्थाटन करण्यासाठी लोक प्रवास करीत. विद्वान ब्राम्हण व साधुसंत यांनी कारणपरत्त्वे देशभर संचार केला पण या सर्वांनीच आपल्या प्रवासाचा वृत्तांत लिहून ठेवलेला नाही.

नारो बहाळियेच्या ऋध्दिपूर वर्णनापासून मराठीत प्रवासवर्णने मिळतात. नामदेवादिकांनी तीर्थयात्रेच्या निमित्ताने केलेली तीर्थावळी, पानपताहून परतलेल्या माणसांनी केलेली आत्मपर लिखाण हे आपले एतदैशीयक  पुर्वसंचित इंग्रजी अमदानीत प्रवासवर्णने म्हणजे पुष्कळदा माहितीपर ग्रंथ असत.

१९२५-२६ च्या दरम्यान वि. स. खांडेकर आणि ना. सी. फडके यांनी इंग्रजीतील Personal essay या वाङ्.मय प्रकारावरून मराठीत ललित निबंध हा आत्मनिष्ठ प्रकार रूढ केला. या वाङ्.मय प्रकाराची तात्विक चर्चा ही केली. ना. सी. फडके यांनी त्याला हितगुज, गुजगोष्टी असे नाव दिले, तर वि. स. खांडेकर यांनी लघुनिबंध असे नाव दिले.

हा वाङ्.मय प्रकार इंग्रजीतून मराठीत आला असला तरी फ्रेंच मधील 'एसाय्' या चा लेखक 'मॉटेन' यांच्या निबंध लेखनावरून तो इंग्रजीत आला. या संदर्भात

मॉटेनने काढलेले उद्‌गार महत्त्वाचे आहेत. तो म्हणायचा " I am myself subject of my book" (माझ्या लेखनाचा विषय मीच आहे) लघुनिबंधाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्या लेखनातील 'मी' होय. लघुनिबंधात थेट लेखक 'मी' असतो. इंग्रजीतील सुप्रसिध्द 'जान्सन' यानेही लघुनिबंध म्हणजे 'मनाची स्वैर क्रिडा होय. ( a loose sally of the mind) असे म्हटले आहे.

खरा अर्थाने प्रवासवर्णन लेखनाची सुरुवात झाली ती गोडसे भटजींच्या 'माझा प्रवास' या पुस्तकापासून, एक अस्सल आणि सच्चे प्रवासवर्णन म्हणून त्याकडे पाहिले जाते. त्यांनी हे प्रवासवर्णन १८८७ मध्ये लिहिले. १९०७ मध्ये प्रसिध्द केले.

**प्रवासवर्णन वाङ्.मयाचे स्वरूप :**

प्रवासवर्णन प्रत्यक्ष जीवनात घडलेल्या घटना प्रसंगावरच लिहिले जाते. कल्पना करून अगर इतरांच्या सांगण्यावरून, वाचन करून प्रवासवर्णन लिहिले जात नाही. जर लिहिले तर ते प्रवासवर्णनच होऊ शकत नाही. तसे लेखन करण्याचा खरं तर कोणी प्रयत्नच करीत नाही. यासंदर्भात गंगाधर गाडगीळ म्हणतात, ''प्रवासवर्णन हे मुख्यत: एका व्यक्तीने प्रवासात पाहिलेल्या किंवा अनुभवलेल्या गोष्टींचे वर्णन असते ।''[१]

प्रवासवर्णन ही एक गुढ प्रक्रिया आहे. गंगाधर गाडगीळ म्हणतात, ''प्रत्यक्ष घडलेल्या अगर अस्तित्वात असलेल्या गोष्टींच्याव्दारे ते लिहिलेले असते.''[२] प्रवास करणाऱ्या प्रत्येक प्रवासकर्त्याचा हेतू हा वेगवेगळा असू शकतो. त्यानुसार ते प्रवासाला निघतात. यासंबंधी पु. ल. देशपांडे आपल्या पुर्वरंगमध्ये म्हणतात, ''मी पूर्वेची वारी केली ती जीवनाच्या वाटा निरनिराळ्या नादात चालणाऱ्या देशोदेशीच्या अनोळखी वारकऱ्यांना भेटावे

म्हणून.''[३]

प्रवासवर्णनासंबंधी विचार केला तर असे समजून येते की, प्रवासवर्णन म्हणजे प्रवासाचे वेळापत्रक नव्हे, की एखाद्या प्रदेशाची भौगोलिक माहिती नव्हे. याबाबतीत र. ग. पंडित म्हणतात, ''श्रीमंत, गरीब, भिकारी, साधुसंत, अध्यापक, धर्मोपदेशक, व्यापारी, सरदार यांनी एकाच भूभागाचा प्रवास केला तर त्या प्रत्येकाचा त्या प्रवासातील दृष्टीकोन वेगवेगळा असतो.''[४]

जेव्हा प्रवासकर्ता एखाद्या स्थळाशी भेट देतो ते फक्त भौगोलिक स्थळ नसते तर त्या प्रदेशातील समाजाची एक विशिष्ट अशी संस्कृतीही असते. यासंदर्भात अनंत काणेकरांचे मत विचारात घेऊ ते म्हणतात, ''देश म्हणजे ती विशिष्ट भूमी, ती झाडे, ती पुष्पे, ते वातावरण आणि ती झाडे आपला जीवनरस ज्या जमिनीतून शोषून घेतात, तसेच आम्ही माणसे देश या शब्दातून आमचा जीवनरस शोषून घेतो व आम्ही जे आहोत ते आम्ही होतो.''[५]

खरोखरच प्रवासवर्णन ही एक व्यक्ती सापेक्ष प्रक्रिया आहे. कारण स्वत:लाच प्रवासाला जावे लागते व प्रवासात काही घटना प्रसंग, गोष्टी, स्थळ, समाज, रूढी, परंपरा लोकसंस्कृती यांची नोंद घ्यावी लागते. अगर स्मृतींमध्ये साठवून ठेवावे लागते. जेव्हा प्रवास पूर्ण होतो तेव्हा प्रवास लेखनास मन ओढ घेऊ लागते. पण एका विशेष गोष्टीचे भान लेखनकर्त्यास पाळावे लागते ते म्हणजे लिहित असलेले प्रवासवर्णन हे कलात्मक तर झालेच पाहिजे पण ते नुसतेच माहितीवजा होऊ नये याची दक्षता घ्यावी लागते.

''लेखकाचे व्यक्तिमत्त्व आणि प्रदेश यांचे समतोल आणि कलात्मक दर्शन होताच त्या लेखनाला वाड्.मयीन रूप प्राप्त होते.'' [६] म्हणजे प्रवासवर्णनातील प्रदेश भौगोलिक वैशिष्ट्यांनी व संस्कृतीने युक्त असा असतो. हा प्रदेश त्या समाजाची ओळख करून देत असतो तसेच आपल्यातील वेगळेपणा दाखवून देत असतो. फक्त ते प्रवासकर्त्याला आपल्या चाणाक्ष दृष्टीने ते टिपून घेऊन लेखनीव्दारे कलात्मक अंगाचा वापर करून मांडता आले पाहिजे एवढेच. रा. भि. जोशी म्हणतात, ''स्थळांचे व्यक्तिमत्त्व अनेक घटकांतून व्यक्त होत असते. निसर्गाने त्या स्थळांची केलेली रचना त्याचा खडबडीतपणा, रूक्षपणा, भव्यपणा, कोतेपणा, रेखीवता, रमणीयता इत्यादी त्याला व्यक्तिमत्त्व प्राप्त क रून देत असतात. तेच स्थल आपली काही वैशिष्ट्ये घेऊन जीवंत होऊन राहते व त्यातून प्रवासवर्णनाला जीवंतपणा येतो.'' [७]

प्रवासवर्णन हे जसेच्या तसे लिहिले जात नाही लेखनकर्ता लेखनाला बसतो तेव्हा स्मृतींच्या कप्प्यांतून एके क प्रसंग आठवत असतात ते त्याने प्रवासात प्रत्यक्ष पाहिलेले असल्याने बऱ्याचवेळा स्वत:ला बंधन घालून घेतो. कारण प्रवास व प्रवासवर्णन हे स्वत:विषयची प्रक्रिया असली तरी वाचक हा समाजातील घटक असल्याने समाज, संस्कृती, व्यक्ती या महत्त्वाच्या बाबींचाही लेखकाला विचार करावा लागतो. या संदर्भात वा. ल. कुलकर्णी म्हणतात, ''प्रवासवर्णन ही अनुभवांची नवनिर्मिती असते.'' [८] म्हणूनच अनंत काणेकरांचे धुक्यातून लालताऱ्याकडे हे अनुभवांच्या नवनिर्मितीमुळे जीवंत व वाचनीय वाटू लागते.

प्रवासी जेव्हा प्रवास करत असतो तेव्हा तो फक्त बाहेरचे जग सहज पाहत असतो हिच बाब कलावंत लेखकाच्या बाबतीत घडू शकत नाही. कारण लेखक प्रवासी हा

प्रत्येक स्थळातून, घटनेतून, व्यक्तीतून काहीतरी वेगळेपण शोधण्याचा प्रयत्न करत असतो. हेच विशेष प्रवासवर्णनकर्त्या लेखकाचे असते. प्रवासवर्णन ही अनुभवाची साठवणूक तर असतेच पण त्यात पुनर्मांडणी असते. प्रवासवर्णन कोणत्याही स्थळाचे असो, एखाद्या निसर्गसौंदर्य ठिकाणाचे असो, भकास वाळवंटातील असो किंवा औद्योगिक वसातहतीतील एखाद्या उद्योगाचे असो, जेव्हा लेखक अशा वेगवेगळ्या ठिकाणी भेटी देतो तेव्हा त्याला प्रत्येक ठिकाणी वेगळेच अनुभव येतात. फक्त लेखकाकडे कंटाळवाणेपण नसला पाहिजे, कलात्मकदृष्टी असायला हवी, रसिकता हवी, मनमिळाऊवृत्ती हवी. सूक्ष्म ग्रहणक्षमता हवी तरच एखाद्या प्रदेशाचे, ठिकाणाचे, शहराचे, उद्योगाचे वाचनीय व माहितीपर असे प्रवासवर्णन वाचक वर्गाला मिळू शकेल.

प्रवास अगोदर पुढील घटनांचे वर्णन लिहिता येत नाही. तर जसा प्रवास होईल तसा अनुभव वाढेल व त्यातूनच लेखनाची मांडणी करावी लागते. रा. भि. जोशी यांच्या मताप्रमाणे ''प्रवासवर्णन ही एक गूढ प्रक्रिया आहे. प्रवास प्रदेश व प्रवासी यांच्या एकजीव होण्यातून ते आकार घेत असते.'' [९]

डॉ. सुधीर रसाळांनीही प्रवास वर्णनासंदर्भात विचार मांडले आहेत. ते म्हणतात, ''प्रवासवर्णन म्हणजे संघटित झालेल्या नवप्रदेश संबंध अनुभवांची अभिव्यक्तीच असते.'' [१०]

**प्रवासवर्णन वाड्.मय प्रकाराचा अर्थ / व्याख्या :**

प्रवासवर्णन प्रवासी, प्रवास आदी शब्दांचे कोशगत अर्थ 'प्रवासवर्णन' हा नपुसकलिंगी शब्द 'प्रवास+वर्णन' या दोन शब्दांचा मिळून झालेला आहे. हे स्पष्टच आहे.

त्यापैकी 'प्रवास' हा शब्द पुल्लिंगी सामान्य नाम असून तो 'प्र+वस्' अशा

मूळ संस्कृत शब्दाने साधित झालेला असून 'प्र' म्हणजे 'दूर' व 'वस' हा संस्कृत धातू 'राहणे' असा अर्थ व्यक्त करतो. 'वस' या संस्कृत धातूवरून 'वास' हे नाम सिध्द झाले आहे. 'प्र + यास' म्हणजे प्रवास असा मूळ शब्द सिध्द होतो आणि त्याचा अर्थ 'दूर राहणे' असा होतो.

इंग्लिश शब्दकोषात प्रवासवर्णनाला 'Travelogue' असा शब्द वापरला असून त्याचा अर्थ "A lecture or talk on travel, often illustrated pictorially" म्हणजे वारंवार उदाहरणे देऊन किंवा आकृती काढून स्पष्ट केलेले प्रवासपर भाष्य होय.

**प्रवासवर्णनाच्या व्याख्या :**

आतापर्यंतच्या एकूणच्या प्रवासवर्णनपर विषयावर ज्यांनी सखोल व पी. एच. डी. मिळवली ते डॉ. वसंत सावंत यांच्या व्याख्यांचा विचार करू.

**डॉ. वसंत सावंत :**

''प्रवासवर्णन म्हणजे 'प्रवासात पाहिलेल्या किंवा घडलेल्या गोष्टींचा वृत्तांत'' [११] त्याचा वृत्तांत दुसऱ्यांना सांगता येण्यासारखा असतो म्हणजे प्रवास हा प्रवाशाचा एकप्रकारे 'अनुभव' ठरतो. आणि तो 'अनुभव' वर्णन करण्यालायक अनुभव असतो.''

**डॉ. चंद्रकांत वर्तक व डॉ. शरद राणे :**

''आपल्या स्वत:च्या शरीर–मनाने केलेल्या प्रवासाचा प्रवासात घेतलेल्या आलेल्या अनुभवांचा आणि मनावर स्थळादी गोष्टींचा झालेल्या संस्काराचा स्मृतीरूपाने

केलेला जागर घेतलेला पुनर्शोध, शब्दरूपात सजीव करणे म्हणजे प्रवासवर्णन होय.''[१२]

**वाल. ल. कुलकर्णी :**

''अनुभवाची पुननिर्मिती म्हणजे प्रवासवर्णन होय.''[१३]

**प्रवासवर्णनाच्या प्रेरणा :**

मराठीतील प्राचीन कवी मोरोपंतांनी म्हटल्याप्रमाणे

'केल्याने देशाटन पंडित मैत्री सभेत संचार।

शास्त्रग्रंथविलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार ।।''

**अर्थ :** निरनिराळ्या देशात प्रवास केल्याने, विद्वानांशी मैत्री ठेवल्याने, सभेत बोलण्याने, शास्त्राचे व ग्रंथाचे अवलोकन केल्याने माणसाच्या अंगी फार चातुर्य येते.

**डॉ. वसंत सावंत यांनी सांगितलेली प्रवासाची कारणे :** [१४]

या संदर्भात म्हणतात ''प्रवास हा खालील कारणाने, उद्देशाने केलेला दिसेल १) राजकारण २) व्यापार ३) तीर्थाटन ४) विद्यार्जन ५) रणयात्रा ६) नवप्रदेश पाहणे ७) आनंदा प्रित्यर्थ ८) राजकुमारींचा शोध घेणे ९) हिरे, मोती, जड जवाहीर यांचा शोध घेणे १०) धनलाभ ११) लौकीक सृष्टीचे ज्ञान मिळविणे. १२) परदेश दौत्यकर्म १३) दुष्काळ व रोग्यांया साधीमुळे १४) केवळ दैवयोगाने १५) मनोरंजन १६) नैसर्गिक आपत्तीमुळे १७) मानवी मनाच्या मुलभूत प्रवृत्तीमुळे १८) विद्वत्सभेत भाग घेण्यासाठी १९) यज्ञयाग करून राजाश्रय मिळविणे २०) जिज्ञासेमुळे २१) व्यवसायार्थ अशा अनेक कारणांनी व उद्देशांनी प्रवास घडल्याचे निदर्शनास येते.

**पु. ल. देशपांडेंनी प्रवासाची सांगितलेली कारणे :** [१५]

१. तीर्थदर्शन

२. विद्यार्जन

३. नवप्रदेश पाहणे

४. आनंदा प्रित्यर्थ

५. लौकीक सृष्टीचे ज्ञान मिळविणे

६. मनोरंजन

७. मानवी मनाच्या मुलभूत प्रवृत्तीमुळे

८. विद्वत्सभेत भाग घेण्यासाठी

९. जिज्ञासेमुळे

**प्रवासवर्णन वाङ्.मयाचे महत्त्वाचे घटक :**

'प्रवासवर्णन' या वाङ्.मय प्रकाराचा विश्लेषणात्मक विचार करताना डॉ. वसंत सावंत यांनी प्रवासवर्णनाचे तीन मुलभूत घटक सांगितले आहेत. त्या संदर्भात ते म्हणतात, ''प्रवासवर्णन मूलत: ज्या अनेक घटकांनी साकारते, त्यापैकी पहिला आणि महत्त्वाचा घटक 'प्रवासी' हा होय. दुसरा घटक 'प्रवास' आणि तिसरा घटक 'प्रदेश' [१६] याचा अर्थ त्यांच्या मते प्रवासवर्णन या वाङ्.मय प्रकाराचा विचार करताना खालील तीन मुद्द्यांचा विचार करावा लागतो.

१. प्रवासी    २. प्रवास    ३. प्रदेश

**'प्रवासी' महत्त्वाचा घटक :**

प्रवासवर्णन हे ज्याने प्रवास केला आहे त्याचे असते. स्वत: प्रवास केल्याशिवाय त्याला प्रवासाचा अनुभव येणार नाही. प्रत्येक प्रवासी लेखकाचे व्यक्तिमत्त्व वेगवेगळ्या प्रकारचे असते. एकाच प्रदेशाच्या अनुभवाची अभिव्यक्ती निरनिराळी असू शकते. 'प्रवासवर्णन' लिहिणाऱ्याच्या अंगी 'प्रतिभाशक्ती' असली पाहिजे. प्रवास करताना सर्वांना अनुभव येतात परंतु अनुभवातील सौंदर्यात्मकता जाणवते व ती व्यक्त करीत असतो. ते कलात्मक करता येईलच असे नाही. त्यामुळे त्याच्या अभिव्यक्तीत नवनिर्मिती असते.

**प्रवास :**

प्रवासवर्णनात दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे प्रवास होय. प्रवासात लेखकाला विविध प्रकारचे चांगले–वाईट अनुभव येतात. या अनुभवांमुळे त्याच्या मनात काही वेळेला 'विचार' येतात तर काही वेळेला 'कल्पना' सुचतात. काही वेळेला 'भावना' उचंबळून येतात. प्रवास करताना लेखकाच्या ठायी एक विशिष्ट प्रकारची 'प्रवासीवृत्ती' असते. म्हणूनच प्रवास करताना लेखकाला येणारा अनुभव इतर सामान्य प्रवाशांपेक्षा वेगळ्या प्रकारचा असतो. हे अनुभव स्थळ, वेळ, व्यक्ती, प्रसंग अशाा विविध घटकांशी निगडीत असले तरी लेखकाच्या मनात उमटलेले विचारतरंग, भावतरंग, कल्पनातरंग वेगवेगळे प्रकारचे असू शकतात.

**प्रदेश :**

प्रवास करत असताना आपण कोणत्या प्रदेशाचा प्रवास करणार आहोत ह महत्त्वाचे असते. अर्थात प्रदेश म्हणजे केवळ स्थळ नव्हे म्हणून डॉ. वसंत सावंत यांनी म्हटले आहे, ''प्रदेश म्हटल्याबरोबर त्याचा भूगोल, इतिहास, धर्म, कला, तिथला निसर्ग,

तिथले वातावरण व इतर गोचर व अगोचर होणाऱ्या गोष्टी तसेच इतर त्या त्या प्रदेशाची खास काही वैशिष्ट्ये यात अभिव्यक्त होऊ शकतात.''[१७]

प्रवासवर्णन करणारा लेखक त्या प्रदेशाचे वस्तुनिष्ठ चित्रण करतातच पण त्याच बरोबर आपल्या वैयक्तिक दृष्टिकोनातून त्य वर्णनाला एक वेगळेपण प्राप्त करून देतो. त्यामुळे त्या प्रदेशातील विविध घटकांना एक प्रवासी चैतन्यमयता, सुंदरता प्राप्त होते. 'प्रवासवर्णन' हा एक वेगळा वाड्.मय प्रकार आहे. आणि तो इतर वाड्.मय प्रकाराप्रमाणेच एक समर्थ वाड्.मय प्रकार आहे असे निश्चित विधान करता येते.

**प्रवासवर्णन वाड्.मयाची वैशिष्ट्ये / विशेष :**

१. प्रवासवर्णन हे एकाच व्यक्तीने प्रवासात पाहिलेल्या किंवा अनुभवलेल्या गोष्टीचे वर्णन असते.

२. प्रवासवर्णन हे प्रवास, प्रदेश व प्रवासी या घटकांनी मिळून बनत असते. प्रवासी हा त्यातील महत्त्वाचा घटक असतो.

३. प्रवासवर्णनात प्रवास कुणी केली यालाही महत्त्व असते.

४. प्रवासवर्णन म्हणजे केवळ प्रवासाचे वेळापत्रक नव्हे. एखाद्या प्रदेशाची भौगोलिक माहिती नव्हे, तो कोणी लिहिला याचबरोबर कोणत्या प्रदेशाचा केला यालाही प्रवासवर्णनात महत्त्व असते.

५. श्रीमंत, गरीब, भिकारी, साधुसंत, अध्यापक, धर्मोपदेशक, व्यापारी, सरदार यांनी एकाच भूभागाचा प्रवास केला तर त्या प्रत्येकाचा त्या प्रवासातील दृष्टिकोन वेगवेगळा असतो.

६. प्रत्येकाच्या दृष्टिकोनात त्या प्रदेशाचे वेगळेपण जाणवते.

७. प्रत्यक्ष प्रवासकर्त्याला आलेल्या अनुभव विश्वावर प्रवासवर्णन लिहावे लागते.

८. प्रवासवर्णनातील प्रवासकर्त्याचे हेतू निरनिराळे असतात.

९. प्रवास हा एका विशिष्ट अशा प्रदेशाचा असतो.

१०. हा वाङ्.मय प्रकार व्यक्तिसापेक्ष आहे.

११. या वाङ्.मय प्रकारात जीवनानुभूतीचा व लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा उत्कट अविष्कार घडत असतो.

१२. प्रवासवर्णनातून प्रवासी लेखक प्रवासी व प्रदेश यांचे कलात्मक समतोल दर्शन घडवावे लागते.

१३. प्रवासात केंद्रिभूत मानून प्रवासी व प्रदेश यांचे कलात्मक समतोल दर्शन घडवावे लागते.

१४. त्यात व्यक्त होणारा 'मी' कलात्मक दृष्ट्या दाखवावा लागतो.

१५. प्रवासात 'मी' ला अधिक महत्त्व असते.

१६. प्रवास – चित्रणात्मक लेखन हे प्रथमपुरूषी असते.

१७. प्रवासातून प्रवासकर्त्याच्या आवडी, निवडी, छंद, सहज लक्षात येतात.

१८. प्रवासवर्णनातील प्रदेश हा भौगोलिक वैशिष्ट्यांनी व संस्कृतीने युक्त असा असतो.

१९. प्रवासवर्णनात त्या स्थळाचे एक प्रकारचे व्यक्तिमत्त्व प्रकट होत असते.

२०. निसर्गाने त्या स्थळाची केलेली रचना त्याचा खडबळीतपणा, रूक्षपणा, भव्यपणा, कोतेपणा, रेखीवता, रमणीयता इत्यादी त्याला व्यक्तिमत्व प्राप्त करून देत असतात.

२१. तेच स्थळ आपली काही वैशिष्टये घेऊन जीवंत होऊन राहते व त्यातून प्रवासवर्णनाला जिवंतपणा येतो.

२२. लेखकाला प्रवासवर्णन लिहित असताना प्रवासातील एखाद्या भौगोलिक प्रदेशातील समाज, संस्कृती, व्यक्ती यांचा विचार करून त्यावर भाष्य करावे लागते. तेथील समाज, संस्कृती, व्यक्ती यांना आपल्या विचाराने गालबोट लागणार नाही याचाही सूक्ष्मपणे विचार करावा लागतो.

**प्रवासवर्णन – लेखनाची तयारी व काही गुणधर्म :**

कोणत्याही प्रवासास जाताना प्रवासकर्त्याला काहीतरी तयारी करावी लागते. जेव्हा लेखक प्रवास करण्यासाठी निघतो तेव्हा त्याला आपल्या प्रवासासाठी विशेष काळजी घ्यावी लागते. तसेच प्रवासकर्त्या लेखकाकडे काही गुणधर्म ही असणे जरूरीचे असते त्या संदर्भात डॉ. आनंद पाटील म्हणतात. ''प्रवासवर्णन – लेखक काही प्रमाणात वार्ताहार,पत्रकार असावा लागतो. संशोधक, कादंबरीकार, साहसवीर असा मुसाफीरही असावा. त्याच्या पायांवर चक्र कोरले असेल तर उत्तमच. त्याचे मन मोकळे असावे पूर्वग्रहांनी डागळलेले नसावे. स्थळांची माहिती जमवून प्रवासाला निघणे जास्त चांगले असते.'' [१८] वरील गुणधर्म लेखकाच्या अंगी असतील तर लेखन सक्षम व उत्तम प्रकारचे होऊ शकते. आणखीन काही पथ्ये पाळण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे म्हणून आनंद पाटील म्हणतात, ''प्रवासवर्णनाला मोठ्या प्रमाणावर संवादात मांडणे उपकारक नसते. मधूनमधून प्रवासात भेटलेल्या पात्रांच्या संवादाचे नाट्यमय तुकडे प्रभावी ठरतात.'' [१९] लेखनाच्या बाबी, तंत्रे म्हणून त्या साहित्य प्रकाराला बाधा आणणारे घटक असतात. त्यांचाही विचार लेखकाने केला पाहिजे. एखाद्या घटकाची अतिशयोक्ती झाली तर त्याचेही पथ्य पाळले पाहिजे. हेच आनंद पाटील यांना वरील विधानातून नमूद करावयाचे आहे.

**प्रवासवर्णनाचे तंत्र :**

''प्रवासाचा अनुभवाच्या अनेक पातळ्या असतात. त्यामुळे प्रवासवर्णनाची गुणवत्ता लेखकाची प्रवासाची ओढ, वाचन, चर्चा, ज्ञानाचा वाढता परीघ, संवेदन आणि निरीक्षणक्षमता यावर अवलंबून असते. त्यात तो लेखक व इतर घटक प्रतिबिंबित झालेले असतात. अहवाल, पत्रकारिता व सृजनात्मक लेखन वगैरे कौशल्यांचा मेळ त्यात बसावा लागतो. लेखनावर ताबा ठेवावा लागतो. काल्पनिक गोष्टी मोठ्या प्रमाणावर खपत नाहीत. सुंदर व कुरूप समतुल्यतेने मांडावे लागते. माहितीची सत्यता पडताळून पाहणारे जाणकार वाचक असतात. तपशिलाच्या चुका राहून चालत नाही.''[२०] तसेच लेखकाने तीन बाबी ध्यानात घ्याव्या तर त्या कोणतय तेही सांगतात. १) प्रवासापूर्वी माहिती संकलन २) प्रत्यक्ष प्रवासातील अनुभवांच्या नोंदी ३) ग्रंथालयातील संदर्भ वगैरे जमा करून प्रवासवर्णन लिहायला बसणे.''[२१]

''प्रवास वर्णन करताना आपल्याला ज्या ज्या गोष्टीची काळजी दक्षता घ्यावी लागते, अनवधानाने काही गोष्टी आपल्याकडून राहून जातात. त्याचेही स्मरण आपल्याला राहिले पाहिजे यासंदर्भात आनंद पाटील म्हणतात, ''नकाशाकडे पाहूनही काहींना प्रेरणा मिळते. प्रवाशासाठीच्या पुस्तिका, जाहिराती, स्थळांच्या माहितीची चित्रे इ. मालमसाला जेवढा जास्त जमा करावा तेवढा थोडाच. प्रवास केलेल्या देशातील पर्वत, नद्या व गावांची नावे नंतर आठवत नाहीत, तेव्हा हे साहित्य मदतीला येते. चित्रावरून लोकांच्या वेशभूषा, रंगरूप आणि आचार–विचार आठवू लागतात. भूतकाळातील दंतकथा आणि वर्तमानात भेटलेली माणसे यांच्या कथांचा उपयोग पानपुरकासारखा होतो. पर्यटन खात्याच्या ऑफिसातूनही खूप माहिती छापील स्वरूपात मिळते. ग्रंथालयातील ग्रंथ वाचता

येतील. परदेशातील लोकांशी बोलावे व त्यांचे बोलणे ऐकावे. ते प्रसंग प्रवासवर्णनात नोंदवल्यास त्याला अधिक जीवंतपणा व अधिकृतपणा प्राप्त होतो. संधी मिळेल तेव्हा स्थानिक लोकांना भेटावे. जमल्यास त्यांच्या मुलाखती घ्याव्या. व्यक्ती आणि वल्लींची ही छोटी शब्दचित्रे प्रवासवर्णनातील मोठा ठेवा असतो. अनवधानाने आपण पूर्वनियोजन केलेले नसते त्या देशातील संकेत व वागण्याच्या पध्दती माही त नसतात, अचानक आपणाला एखादी सुंदर कल्पना सुचते. पण ती तिथल्या परिस्थितीमुळे प्रत्यक्षात उतरत नाही.

लेखक प्रवाशाने नेहमी आपल्या हाताशी नोंदवही ठेवावी. परक्या भाषेतील काही शब्द व वाक्यप्रचार अर्थासह प्रवासवर्णनात आल्यास त्याला संबंधित वास्तवाची चांगली डूब मिळते.

लेखकाने ताबडतोब प्रवासवर्णन लिहायला घेतले तर काही जागा नक्की कोऱ्या राहतात. तपशील व तारखांचा गोंधळ उडतो. रेल्वे किंवा विमान–प्रवासाच्या दिशा चुकतात. पर्यावरणाचा समतोल बिघडतो. अशावेळी लेखकाने ग्रंथालयाची वाट धरावी नकाशे पहावे. संदर्भ पडताळून खात्री करावी. शब्दोच्चार शब्दकोष पाहून पक्के करावे. नव्या आत्मविश्वासाने प्रवासवर्णनाचे लेखन पुढे सुरू करावे. लेखनाचा प्रवास वाचकाकडे दुर्लक्ष करून चालू ठेवू नये.'' [२२]

**प्रवास वर्णनाच्या सजावटीची साधने : फोटो व रेखाचित्रे**

छायाचित्रे काढणे हा प्रवासातील एक प्रमुख विधीच ठरला आहे. पण आपल्या प्रवासवर्णनाला पूरक ठरणारे फोटो बऱ्याच वेळा नियोजनपुर्वक काढून घ्यावे लागतात. तांत्रिक दृष्ट्या ते छपाईसाठी योग्य असावे लागतात. रेखाचित्रेही फार परिणामकारक ठरतात.

दृश्य परिणाम साधणारे, मूड दाखवणारे, वातावरणदर्शक, स्थळदर्शन घडवणारे असे अनेक फोटो असतात. संहितेला उठाव देणारे फोटो फारच हुशारीने निवडावे लागतात.

प्रवास वर्णनात नाट्यमयता आणणारी छायाचित्रे छापावी. प्रवासवर्णनातील वर्णनाशी विसंगत ठरणारी छायाचि त्रे वापरू नयेत. त्यांची पुनरावृत्ती टाळावी. शेवटी आयुष्य हा ही एक जीवनप्रवास आहे आणि तो एकट्याने करायचा आहे.

**प्रवासवर्णनातील 'मी' चे दर्शन :**

''प्रवासवर्णनात व्यक्त होणारा 'मी' दोन प्रकारचा असतो. एक लौकिक पातळीवरचा 'मी' आणि दुसरा कलात्मक पातळीवरचा 'मी.' लौकिक पातळीवरचा 'मी' हा एक वस्तुनिष्ठ घटक असतो. तो लौकिकाशी निगडित असतो. प्रवासात तो आपल्या आवडी–निवडी घेऊन आणि लौकिक आशा–अपेक्षा घेऊन वावरत असतो. त्या लौकिक 'मी' ला व्यावहारिक जीवनाची चौकट असते. त्यामुळे एक प्रवासी म्हणून तो वाचकांना परिचित होतो.'' ''लौकिक 'मी' चे दर्शन घडले तर लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय होतो, त्याने केलेल्या लेखनाची प्रेरणा समजू शकते, पण त्याने पाहिलेला प्रदेश पुर्णत: वाचकांना प्रतीत होत नाही. कारण साऱ्या प्रदेशावर आणि वर्णनावर या लौकिक 'मी' चा वरचष्मा असतो.''

कलात्मक पातळीवरील 'मी' हा बहुश्रूत असतो, प्रचंड वाचनाची आवड असणारा असतो तसेच सूक्ष्म निरीक्षण क्षमता असणारा असतो, त्याच्याकडे मिस्किलपणा, काव्यमयता, विनोदबुध्दी, इतिहास संशोधक वृत्ती, तटस्थ, तादाम्य, प्रवासाची आवड असणारा असतो. त्याच्याकडे मनमिळाऊपणा असतो. प्रत्येक घटकातून वेगळेपण

शोधण्याचा त्याचा अर्थ लावण्याचा तो प्रयत्न करीत असतो. उद्‌बोधन, उपदेश हे त्याच्या लेखनीचे गुणवैशिष्टे असतात. वास्तवाची जाणीव असते. समंजस्यपणा ह्या व इतर सर्व गुणविशेषांच्या मिश्रणाचा परिपाक हा कलात्मक 'मी 'मध्ये असतो. म्हणूनच प्रवासवर्णनासारखा ललितवाड्.मय प्रकार साहित्यक्षेत्रात लोकप्रिय होतो हे उघड सत्य आहे.

''त्यांच्या लौकिक जीवनातील समाधान देणाऱ्या गोष्टींनाच तेथे अधिक अवसर प्राप्त होतो. लौकिक 'मी' जे महत्त्वाचे वाटते त्याचे स्वरूपच भिन्न असते. कलात्मक पातळीवरील 'मी' महत्त्वाच्या वाटणाऱ्या गोष्टी कलावंत 'मी' हा लौकिक 'मी' पेक्षा वेगळा असतो. आणि त्याला भावणाऱ्या गोष्टीही वेगळ्या असतात. आणि त्या गोष्टी वर्णनात अपरिहार्यपणे व्यक्त व्हाव्यात अशी आपली अपेक्षा असते.''[२३]

**समारोप :**

या प्रकरणात आपण प्रवासवर्णनांचा उगम कुठून व कसा झाला याचे विवेचन पाहिले, प्रवासाची प्रथमावस्था कशी होती, प्राचीन कालखंडात मराठी भाषेत प्रवासवर्णने लिहिण्यास कोणी सुरूवात केली याचेही विवेचन पाहिले आहे. मराठीमध्ये खऱ्या अर्थाने प्रवासवर्णन वाड्:मयाचे स्वरुप पाहत असताना, मराठीच्या साहित्यक्षेत्रात प्रवासवर्णन लिहून ज्यांनी नावलैकिक मिळविला त्या लेखकांच्या मतांचा या प्रकरणात स्वरुप विवेचनासाठी जो आधार घेतला तोही पाहिला. तसेच प्रवासवर्णन वाड्:मय प्रकाराचा अर्थही पाहिला असून, संस्कृत शब्दातून प्रवास हा शब्द कसा निर्माण झाला त्याची उत्पत्तीही दिली असून त्याचा अर्थही दिला आहे. इंग्रजी शब्दकोशातही प्रवासवर्णनसाठी कोणता शब्द आहे तो दिला असून त्याचेही विश्लषण केले आहे. तसेच मराठीतील ज्यांनी प्रवासवर्णनावर

पी.एच.डी. मिळविली त्यांच्या प्रवासवर्णनावरील व्याख्येचा तसेच इतरांच्या व्याख्यांचा अंतर्भाव केला आहे. ह्या जाणकारांच्या व्याख्यांतूनही प्रवासवर्णनाचे स्वरुप व विशेष आपणास समजून आले. प्रवास हा कोणत्या हेतूने केला जातो? त्याच्यामागील कारणे काय? प्रवासाच्या प्रेरणा कोणत्या? याचाही उल्लेख केला आहे. यामध्ये प्राचीन कवी मोरोपंतांचा उल्लेख असून, याच विषयावर डॉक्टरेट मिळविलेले वसंत सावंत तसेच पु.ल.देशपांडे यांच्याही सांगितलेल्या कारणांचा उल्लेख केला आहे. प्रवासवर्णन वाङ्:मयाचे महत्वाचे घटक कोणते हे डॉ. वसंत सावंत यांच्या मताचाही समावेश केला आहे. प्रवासवर्णन लेखनाची तयारी वा काही गुणधर्म डॉ. आनंद पाटील यांच्या विवेचनावरुन सांगण्याचा प्रयत्न केला आहे. प्रवासवर्णनाचे तंत्र कसे असावे, तसेच प्रवासवर्णनाच्या सजावटीची साधणे फोटो व रेखाचित्रे यामुळे प्रवासवर्णन लेखनात वास्तवता व नाट्यमयता कशी येते याचेही विवेचन केले आहे. प्रवासवर्णन हे आत्मनिष्ठ स्वरुपाचे असते प्रवासवर्णनात लेखकाच्या आत्म निवेदनालाही महत्व असते. प्रवासवर्णनात जो 'मी' व्यक्त झालेला असतो तो दोन पातळीवरचा असतो. याचेही विवेचन या प्रकरणात केले आहे. अशा सर्व घटकांचा आपण या प्रकरणात उल्लेख पाहिला आहे.

पुढील प्रकरणात उषा पाणंदीकर यांच्या प्रवासलेखनाच्या प्रेरणा व स्वरुप पाहू.

# संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | गाडगीळ गंगाधर | : | साहित्याचे मानदंड<br>पॉप्युलर प्रकाशन, मुंबई – ३४, प्रथमाआवृत्ती<br>१९६३. पृ. क्र. १७४ |
| २. | गाडगीळगंगाधर | : | पुर्वोक्त पृ. क्र. १७४ |
| ३. | देशपांडे पु. ल. | : | पुर्वरंग पृ. ३४७, देशमुख आणि कं, पुणे दु. आ,<br>१९७०. |
| ४. | पंडित र. ग. | : | ''हिंदूस्थानातील आमच्या ठिकठिकाणच्या<br>सफरी,'' संपा. बा. ह. देशपांडे, भोर प्रथमावृत्ती<br>१९०९ पृ. क्र. १८ |
| ५. | काणेकर अनंत | : | धुक्यातून लाल ताऱ्याकडे, चौथी आवृत्ती,<br>१९६७ मुंबई, प्रकरण 'घराकडे'<br>पृ. १९४–१९५ |
| ६. | कुलकर्णी गो. म. | : | मराठी वाड्.मयाचा इतिहास |
| | कुलकर्णी व. दि. | : | (इ. स. १९२० ते १९५० या कालखंडातील<br>मराठी वाड्.मयाचा विवेचक इतिहास)<br>खंड सहावा : भाग<br>दुसरापृष्ठ २१६ पहिली आवृत्ती २७ मे १९९१<br>महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे. |

७. जोशी रा. भि. : 'प्रवास लेखन' प्रस्तावना पृ. क्र. ४, ''मजल दरमजल'' मौज प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती १९६१.

८. कुलकर्णी वा. ल. : वाटचाल, प्रस्तावना प्रथमावृत्ती, दु. आ. १९६६, मुंबई. पृ. २.

९. जोशी रा.भि. : 'प्रवासलेखन' प्रस्तावना ''मजल दरमजल'' मौज प्रकाशन, मुंबई. प्रथमावृत्ती १९६१ पृ. ४

१०. रसाळ सुधीर : 'सत्यकथा' नोव्हें. १९७१, शिवारणीच्या शोधात', परिक्षण पृ. ४

११. सावंत वसंत : प्रवासवर्णन एक वाङ्.मय प्रकार : प्रथमावृत्ती मुंबई, १९८७, पृ. १८

१२. वर्तक चंद्रकांत व डॉ.राणे शरद : ललितगद्य वाङ्.मयप्रकार : आकलन आणि रसास्वाद प्रथमावृत्ती नाशिक, १९९१, पृ. १२.

१३. कुलकर्णी वा. ल. : वाटचाल प्रस्तावना, प्रथमावृत्ती दु. आ. मुंबई १९६६. पृ. २.

१४. सावंत वसंत : पुर्वोक्त ( उनी ) पृ. ११

१५. देशपांडे पु. ल. : अपूर्वाई, आवृत्ती सोळावी पुणे, १९९९, पृ. १४०, १४१.

१६. सावंत वसंत : पुर्वोक्त ( उनी ) पृ. २२

१७. सावंत वसंत : तत्रैव पृ. ३०

१८. पाटील आनंद : सृजनात्मक लेखन, पद्मगंधा प्रकाशन पुणे. पान २६३.

१९. पाटील आनंद : तत्रैव पृ. २६६ प्रथमावृत्ती मार्च २००५

२०. तत्रैव : पृ. २६७

२१. तत्रैव : पृ. २६७

२२. तत्रैव : पृ. २६७२२.तत्रैव: पृ. २६७, २६८, २६९.२३. संपा. २२.

२३. कुलकर्णी गो. म. : मराठी वाड्.मयाचा इतिहास
कुलकर्णी व. दी. : खंड सहावा : भाग दुसरा १९२० ते १९५० या कालखंडातील मराठी वाड्.मयाचा विवेचक इतिहास महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे. पहिली आवृत्ती २७ मे १९९१. पृ. २१६, २१७.